## "यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा ?"

# पद्मविभूषण पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर

जन्म - कोलगाव, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग - १९.९.१८६७

मृत्यू - पारडी, जि. बलसाड, दि.३१.७.१९६८

महामहोपाध्याय, गीतालंकार, साहित्य-वाचस्पती, विद्यामार्तंड, ब्रह्मर्षि, भारताचे चित्रकला क्षेत्रातले प्रपितामह, डॉक्टर ऑफ लॉज् (D.Lit), रणझुंजार, महर्षि, वेदवाचस्पती, पद्मविभूषण, राष्ट्रीय संस्कृत पंडित, विद्वत्कुल शेखर ..... इत्यादी अनेक पदव्यांनी समलंकृत पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर यांच्या विश्वतोमुखी प्रतिभेमुळे आणि त्या प्रतिभेला सदृश अशा त्यांनी स्वतःच्या प्रज्ञेने निर्माण केलेल्या कार्य-कर्तृत्वाच्या पर्वत-शिखरांकडे पाहून; घरची वैचारिक श्रीमंती परंपरेने जपलेली असेल, सात्विक गुणश्रीमध्ये ओल्याचिंब झालेल्या वृत्ती-प्रवृत्ती सदैव अंकुरित स्वरूपामध्ये असतील, तर प्रतिकूल परिस्थितीला पायदळी तुडवून, प्रज्ञावान् व्यक्ती काय करू शकते याचा तो एक आदर्श पुरावा होईल. यांच्या नावामागे लेखारंभी दिलेली विशेषणे अनेक प्रसंगांनी, अनेकानेक संस्थांनी त्यांना दिलेली विशेषणे - त्यांचा गौरव आहे. ते माझे शब्द नव्हेत.

अनेक उत्तम, सत्त्वशील घराणी सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यातून आपल्या समाजाची दिसतात. श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंब्ये स्वामींचे घराणे तसेच माइणकर, सातवळेकर, लुकतुके, खाण्डेकर, मणेरीकर, माडखोलकर, बांदेकर, बाक्रे, किर्लोस्कर, जांभेकर, देवस्थळी, मिराशी, पाध्ये-गुर्जर, पळसुले, किंजवडेकर, नवरे, हर्डीकर, हळबे, तळवलकर, चिरमुले, वळामे, आठल्ये, पुराणिक, पुरोहित, गुण्ये, बिर्नीवाले, पोतदार, सरपोतदार, पंडित, तांबे, सरदेसाई, मावळंकर, भागवत, पळसुले, शहाणे, भाट्ये, पणशीकर, पराडकर, धुपकर, नाटेकर, काजरेकर, ताटके, शेजवलकर, देसाई .... एक ना दोन, अगणित लोकांची एकसारखी संस्कृती या प्रत्येक घराण्याने शेकडो वर्षे खपून कऱ्हाडी भाषेसह निर्माण केली, जपली, वाढवली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही. म्हणूनच ही संस्कृती कधी डागाळली नाही की ढेपाळली नाही. औद्योगिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक विद्वत्तेचे क्षेत्र - आर्थिक सामाजिक क्षेत्रात या समाजाचे योगदान फार मोलाचे आहे. त्याचमुळे भारतासारख्या विशालकाय देशातल्या दोन मोठ्या राज्यांचे मुख्यमंत्री, तीन राज्यांचे विधान सभापती, लोकसभा-अध्यक्ष, देशाचे गृहमंत्री, संख्येने अतिअती छोट्या अशा एका समाजाने द्यावेत याचे आश्चर्य वाटणार नाही. म्हणूनच या समाजातल्या स्वयंभू, गुणश्रेष्ठ व्यक्तिमत्त्वांचा काही मंडळी सतत द्वेष करतात. त्यांना सतत खाली ओढत रहातात. या जिल्ह्यात प्रत्येक घरातून शिक्षण घेऊन परिश्रमाने विद्यासंपन्न झालेल्या अनेक घराण्यांनी आदर्श परंपरा निर्माण केल्या, ज्या परंपरांमध्ये, दोषैक दृष्टीला स्थान नव्हते, लांडी-लबाडी ही विद्या म्हणून नव्हती, व्यक्तिद्वेषाची लागण नव्हती, जातिमत्सर, उच्चनीच भाव, फसवण्यातली चलाखी, दुसऱ्यावर वरताण करण्यासाठीचे कसब .... या गोष्टी निंद्य समजल्या जात. दुसऱ्याचे द्रव्य लाटण्याच्या युक्त्या माहीत नव्हत्या, आपले टोळके निर्माण करून आपल्या लोकांच्याच फायद्याकरता कार्य करायचे कसब नव्हते. संस्थांची स्थापना स्वजनांच्या सोयीचा विचार करून तेवढ्यापुरतीच नव्हती; आपल्याला पुढे बाधक ठरणाऱ्या गुणी लोकांना लहानपणापासूनच खुडून टाकण्याच्या विद्या माहीत नव्हत्या; आत्माभिमान आणि आत्मगौरव या सोयीने वापरण्याच्या बाबी नव्हत्या.

तो काळ असा होता की बाबा पदमनजी म्हणत

त्याप्रमाणे (पहा - 'विश्रब्धशारदा') आपल्याच लोकांच्या राज्याचा लोकांनी अनुभव घेतला होता. याउलट ब्रिटिशांनी लागू केलेली सती बंदी १८२९; विधवा विवाहाचा कायदा १८५६, ठग लोकांना परिणामकारक आळा १८३६, इंडियन पिनल कोडसारखा कायदा १८६०, तसेच अनेकानेक जनहिताचे कायदे करणाऱ्या ब्रिटिशांबाबत औत्सुक्य उत्पन्न झाले होते. विधवा विवाहाचे पहिले खंदे पुरस्कर्ते विष्णु परशुराम पंडित १८१६, मराठीतील पहिले वृत्तपत्र - बाळशास्त्री जांभेकरांनी १८३२ मध्ये सुरू केले. एकोणिसाव्या वर्षी ते पहिले भारतीय प्रोफेसर झाले. क्षुद्र जातीय विचारांना थारा मिळणार नाही; अशी परिस्थिती निर्माण होत होती. स्वतःच्या हिमतीवर, गुणांवर वर येणाऱ्या लोकांसाठी तो अनुकूल काळ होता. माध्यमांच्या साह्याने गुणी लोकांना पराभूत करणे शक्य होणारे नव्हते. अशा सर्वस्वी अनुकूल परिस्थितीच्या प्रारंभी सातवळेकरांचा जन्म झाला. घरीच वेदविद्या - संस्कृत शास्त्रे व्याकरण महाभाष्यापर्यंत शिक्षण झाले. गावातच श्री. लुकतुके यांचेकडे इंग्लीशचे शिक्षण झाले. वैदिक ऋषींच्या तेजस्वी विचारांचा परिचय, गीता-उपनिषदे-भाषणे योगविद्या यातील ओजस्वी विचारांचे अध्ययन, भगवान् श्रीराम - श्रीकृष्णांची चरित्रे, श्री शिवाजी महाराज, तेजस्वी ताराबाई, राणी लक्ष्मीबाई, टेंब्येस्वामी, जांभेकर यांची चरित्रे आणि घराघरातून मिळणाऱ्या ओजस्वी तेजस्वी विचारांच्या रसायनात सातवळेकरांची तेवीस वयापर्यंत वाढ झाली. त्यानंतर ते मुंबईला गेले.

त्यांचे बंधू डॉ. सीतारामपंत यांनी अमेरिकेमध्ये जाऊन रसायनशास्त्रात डॉक्टरेट मिळविली. नंतर हैदराबादला येऊन तिथल्या श्री. नानासाहेब हर्डीकर यांनी व डॉ. सीतारामपंतांनी हैदराबादची ख्यातनाम विवेकवर्धिनी शैक्षणिक संस्था सुरू केली. मुंबईला जाऊन सातवळेकरांनी जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये चित्रकलेचे उच्च शिक्षण घेतले. त्या संस्थेचे 'मेयो मेडल' त्यांनी दोनदा पटकावले होते. त्यांचे चिरंजीव माधवराव सातवळेकर पुढे त्या संस्थेचे डायरेक्टर होते आणि नातू दीपक सातवळेकर आज मोठ्या आर्थिक कारभार करणाऱ्या संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक आहेत. अपवादात्मक प्रज्ञा-वैभवाने उजळणाऱ्या या तीन पिढ्या - पिढ्यानुपिढ्या या परंपरा टिकवणारी, खासगी वा सार्वजनिक जीवना- मध्ये एकच स्वभावविशेष सांभाळणारी अनेक घराणी झाली, आजही विद्यमान आहेत. या घराण्यांनी सात्त्विकता, चांगुलपणा, उदारता, परमताबाबत सहिष्णुता, गुणिजनांचा आदर ही आपली वांशिक गुणवत्ता जपली - वाढविली.

१८९१ पासूनच पं. सातवळेकर स्वावलंबी होते. चित्रे काढून पैसा मिळवीत. त्यांचे सहाध्यायी होते, औंध संस्थानचे राजे श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी. मुंबईत त्यांना १९०० साली आर्ट्स स्कूलमध्ये ५० रु. दरमहाची नोकरी मिळाली. सहा महिन्यांनी ती नोकरी सोडून हैदराबादच्या निजामाकडे गेले. प्रख्यात चित्रकार देऊसकरांच्या साह्याने स्टुडिओ स्थापला. १९०१ ते १९१८ या काळात त्यांनी आर्य समाजाचे काम हिरिरीने केले. १९०२ ते १९०७ थिऑसॉफिकल सोसायटीचेही काम केले. त्यांना मुंबई वा पुणे येथे रहायचे नव्हते. कारण त्यांची पुस्तके सरकारने जाळली व कोल्हापूरचा खटला त्यांच्या लेखांसाठी भरला गेला, याचे कारस्थान या दोन शहरात शिजले म्हणून स्वाभाविकपणे ही दोन शहरे त्यांनी वगळली. (इति गोखले) १९०७ मध्ये जयपूरला सहा महिने व पुढे हरिद्वारला कांगडी येथे शिक्षक म्हणून गेले. तेथे स्वामी श्रद्धानंद कुलगुरू होते. १९०९ ला लाहोरला गेले. १९१८च्या मे मध्ये पं. सातवळेकर औंधला आले. लाहोरला सातवळेकरांचा स्टुडिओ होता. आज हे आश्चर्य वाटेल; पण राजापूरच्या पाध्येगुर्जरांची कराचीला वेद व संस्कृत पाठशाळा होती.

गुप्त कट-कारस्थाने, शस्त्रे मिळवणे, त्यातून क्रांती घडविण्याच्या योजना ही त्यांची प्रकृती नव्हती.

'आमच्यातल्या दृढनिश्चयाने आम्ही सरकारला नमवू' असे म्हणणाऱ्या महात्मा गांधींचे आकर्षण त्यांना होते. १९२० साली ते सातारा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष झाले. १९३६ मध्ये त्यांनी रा. स्व. संघात प्रवेश केला आणि 'स्वाध्याय मंडळ' सुरू केले. पुरुषार्थ व वैदिक धर्म ही दोन मासिके सुरू केली. गीतेवरची पुरुषार्थबोधिनी ही त्यांची टीका प्रसिद्ध आहे. एकूण ४०४ पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांचा बापटांनी चालवलेल्या यज्ञीय पशुहत्येला विरोध होता. महात्मा गांधींच्या हत्येनंतर १.७.१९४८ पासून ते पारडीला राहिले. त्यांच्या वास्तूचे नाव वेदमंदिर असे होते. स्वाध्याय मंडळामार्फत संस्कृत प्रचाराचे कार्य होत असे. संस्कृत परीक्षांना हजारो विद्यार्थी बसत असत. वेदांच्या आधाराने त्यांनी वीर वृत्तीला आणि मानवतेला उत्तेजन दिले. पारडी येथे स्वाध्याय मंडळाचा रजत महोत्सव ९-१० जानेवारी १९५४ रोजी झाला.

लोकांनी, अनेक संस्थांनी, शासनानेही त्यांचा अनेकदा सत्कार केला, गौरव केला. त्यातले काही ठळक गौरव -

१) **'गीतालंकार' पदवी** - अमृतसरच्या गीता धर्म मंडळाकडून

२) **'महामहोपाध्याय'** - गोवर्धनपीठाचे शंकराचार्यांकडून

३) **'साहित्य वाचस्पती'** - प्रयाग हिंदी साहित्यसंमेलनामध्ये

४) **'विद्यामार्तंड'** - कांगडी गुरुकूल आश्रम १९६० साली.

५) **'ब्रह्मर्षि'** - हठयोगी देवराव बाबांनी स्वतःच्या ११०व्या वर्षी दि.२३.१०.१९६१ रोजी दिली.

६) **'राष्ट्रीय संस्कृत पंडित'** - १९५९ साली भारताचे राष्ट्रपतींनी दिली.

७) **'हत्तीवरून मिरवणूक'** - प्रयाग - बिहार

८) रशियाने हिंदुधर्माचा प्रतिनिधी म्हणून बोलावले.

९) वैदिक धर्माचा प्रतिनिधी म्हणून जपानकडून आमंत्रण

१०) जिनिवाच्या जागतिक परिषदेत आमंत्रण

११) १५.९.१९५७ ला नव्वदावा वाढदिवस साजरा झाला. उपस्थितांमध्ये म. म. दत्तो वामन पोतदार, पूज्य श्री. गोळवलकर गुरुजी, डॉ. व्ही. राघवन-इत्यादी होते.

१२) पुणे विद्यापीठानी १०.४.१९६६ रोजी डी.लिट्. दिली. (पारडीत जाऊन)

१३) १९.९.१९६६ - शंभराव्या वर्षात पदार्पण. उपस्थितांमध्ये प्रख्यात पत्रकार श्री. श्री. टिकेकर, पू. गोळवलकर गुरुजी, डॉ. अ. ग. जावडेकर इत्यादी होते.

१४) फ्रँकफर्ट् - जर्मनी इथल्या डी बेल्ट या प्रसिद्ध दैनिकाने आपल्या वृत्तपत्रात खास पुरवणीमध्ये त्यांचा गौरव केला.

१५) दि.२३.१२.१९६६ रोजी गुजराथ राज्याच्या नागरिकांतर्फे अहमदाबादला विश्वविद्यालयाच्या सभागृहात प्रचंड मोठा सत्कार झाला. इथेच पू. गोळवलकर गुरुजींचेही भाषण झाले. व्हाइस चान्सेलर उमाशंकर जोशींचे जातीने निमंत्रण होते. या मानपत्रात प. सातवळेकरांचे निष्कलंक चारित्र्य, महान त्याग, प्रगाढ पांडित्य, वेदविद्येची अखंड उपासना, स्पृहणीय आरोग्य, दीर्घायुष्य अशा अनेक विशेषांचा उल्लेख करून अनेक पदव्यांचा तुमच्यामुळे गौरव झाला असे मानपत्रात म्हटले.

१६) पुण्यामध्ये २९.४.१९६७ रोजी गोखले सभागृहात सत्कार - याच दिवशी उद्यान प्रासादात गौरवग्रंथ समर्पण हा कार्यक्रम पं. बाळशास्त्री हरिदास यांच्या अध्यक्षतेखाली झाला. कार्यक्रमाला रँग्लर नारळीकर, शंतनुराव किर्लोस्कर, वसंतराव वैद्य, चि. वि. जोग इत्यादी मान्यवर हजर होते. ग. दि.

माडगूळकर यांनी मुद्दाम केलेले गीत श्री. सुधीर फडके यांनी गायले.

१७) दि. २५,३,१९६८ या दिवशी मुंबई विद्यापीठाने पं. सातवळेकरांना, थाटात सत्कार करून डॉक्टर ऑफ लॉज् ही पदवी देऊन गौरविले. अध्यक्षस्थानी कुलगुरू श्री. प्र. बा. गजेंद्रगडकर होते.

१८) दिल्लीमध्ये दि.१४.४.१९६८ या दिवशी भव्य नागरी सत्कार झाला. त्यामध्ये राज्यपाल झा, महापौर हंसराज गुप्ता, पू. गोळवलकर गुरुजी, पं. मौलीचंद्र शर्मा यांनी भाग घेतला होता.

या लिखाणाला थोडासा आधार पं. सातवळेकर यांचे, कराडचे समाजभूषण श्री. पु. पां. गोखले यांनी लिहिलेले आणि उषा प्रकाशन पारडी यांनी प्रसिद्ध केलेले चरित्र आहे. जाडजूड ग्रंथ पण सर्वत्र पं. सातवळेकरांच्या लिखाणातले उतारे - सुमारे नव्वद टक्के व साधारणतः दहा टक्के पाने लेखकाची त्या उताऱ्यावरच्या भाष्य स्वरूपाची ! रूढ अर्थानं याला चरित्र म्हणणे धाडसाचे ठरेल. चरित्रलेखकाने केलेली विधाने गूढार्थ द्योतक, विपर्यस्त, भयावह, व्यंग्यार्थसूचक अशी आहेत. या लेखनातल्या विधानातला हेत्याभास, तर्कदुष्टता, विपर्यास यांचे थोडेसे नमुने पहाण्यासारखे आहेत. सातवळेकरांच्याच खर्चानं हे झाले हा बोचरा, दुर्दैवाचा भाग ! जाणकारांनी हे चरित्र मुद्दाम नीट वाचले तर माझ्यासारखेच त्यांचे मत होईल. सातवळेकरांच्याच खर्चानं त्यांचा अवमान करण्यातला लेखकाचा योजनाबद्ध आनंदही कळून येतो.

१. "भट या घराण्याचे नाव सातवळेकर हे केव्हा व कसे रूढ झाले हे एक राहून गेलेले कोडे आहे." (प्रकरण २ पान ८) अनेक विद्वान ब्राह्मणांना पूर्वी 'भट्ट' या विद्वत्तादर्शक उपनामाने ओळखले जायचे. त्याचे अपभ्रष्ट रूप 'भट' असे झाले. 'भट' आडनावाचे लोक कऱ्हाड्यांमधेही प्राचुर्यानं आहेत. प्रख्यात ज्योतिषी श्री. श्री. भट, कविश्रेष्ठ सुरेश भट, महाराष्ट्र टाइम्सचे वरिष्ठ संपादक मंडळातले श्री. गोपाळ भट हे सर्व कऱ्हाडेच होते वा आहेत. केरळच्या कासारगोड जिल्ह्यामध्ये 'पदरे' या गावात विभिन्न सात गोत्रातली भट आडनावाची एकशे पाच घरे आहेत. हे सर्व कऱ्हाडेच आहेत. श्री. गोखले यांना पं. सातवळेकर हे कोकणस्थच असावेत असे अज्ञानाचे पांघरूण घेऊन सुचवायचे आहे, ते असा विपर्यास करून सुचवले.

२. असा कितीही संशयाचे धुके निर्माण करून विपर्यास केला तरी सातवळेकर कऱ्हाडाच होते हे नक्कीच; तेव्हा आता दुसरी युक्ती पहा (पान ९) " हे घराणे वेद-याज्ञिकीचा - संस्कृतचा अभ्यास करणारे सामान्य दर्जाचे होते". त्यांच्या वंशाचा प्रश्न उपस्थित करून तो हलका होता असे व्यंग्यार्थानं सुचवले. कोणा भट नावाच्या ज्योतिषाचेही मत आधाराला यासाठीच घेतले. त्यांचे म्हणणे वंशदाय हलका असला तरी विष्णुशास्त्री चिपळूणकर, माधवराव रानडे, टिळक-आगरकर, वासुदेव बळवंत फडके यांनी जी परिस्थिती भोवताली निर्माण केली त्यामुळे पं. सातवळेकर असे झाले.

एक तर या प्रत्येकाचा काळ आणि सातवळेकरांच्या बालपणी त्यांचे कार्य व त्याचे परिणाम सावंतवाडीलाही अनुभवता येऊ लागले होते हे गृहीत धरावे लागते. तसे काहीही नव्हते. पं. सातवळेकरांवर ज्यांच्या कार्यकर्तृत्वाचा परिणाम झाला त्यांच्यापैकी एकाही व्यक्तीचे नाव घ्यावे असे गोखल्यांना वाटले नाही. उलट त्यांना खाली ओढण्यासाठीचे त्यांचे भयावह व्यंग्यार्थ असलेले वाक्य पहा - "....मदायत्तं तु पौरुषम्" अशा मनोवृत्तीचे पंडितजी आहेत. एवढे नव्हे तर 'वटवृक्षासम वर्षगणतिने जरी जाहला विस्तार, महति न पावे मुळी नर' हे ते पुरेपूर जाणतात ...."

हे वाचताना महाराष्ट्र शासनाने तुकाराम महाराजांच्या अभंगांची गाथा पुनर्मुद्रण दुसरे १९९१;

याला श्री. पुरुषोत्तम मंगेश लाड या विद्वान सनदी अधिकाऱ्यांची जी प्रस्तावना छापली आहे त्याची आठवण झाली. लोकांनी ती वाचावी म्हणजे विपर्यास करणारी तर्कदुष्ट, सत्यदुष्ट, भ्रांतिजनक, सत्यापलाप करणारी विधाने कशी असतात व कशाप्रकराच्या बुद्धीतून निपजतात ते कळेल. या लिखाणात 'सूतो वा सूतपुत्रोवा यो वा को वा भवाम्यहम्' ह्या त्या श्लोकाचा पूर्वार्ध देणे टाळले. कारण तोच व्यंग्यार्थ होता.

पं. सातवळेकरांची भोवतालची परिस्थिती त्यांनीच सांगितलेली आणि वर माझ्या लेखाच्या प्रारंभी दुसऱ्या परिच्छेदामधे मी दिलेली आहे. ज्याचे चरित्र सातवळेकर कुटुंबियांनी सांगितल्यामुळे लिहायला घेतले; त्या चरित्रनायकाचा वंश हलका होता हे लिहिणे सुचविणे आणि तीही चर्चा करायला काही कारण नसतानाच लेखकाने घ्यावी याच्या-सारखे दुसरे अनौचित्य नाही; आणि सातवळेकर कुटुंबियांचे दुर्दैव नाही. लेखकाच्या मनात खोलवर दडलेले दुष्टतम विचार या कारणामुळे कागदावर आले आणि सातवळेकरांच्या सौजन्याने तसेच संपादकीय संस्कार न करता छापले याचा आम्हाला फायदा असा झाला की यामुळे हे समाजसेवक गोखले आम्हाला कळले. सातवळेकरांच्याच खचर्नि मन उघडे करून ठेवलेल्या प्रदर्शनासारखे दिसले !

आत्माभिमान आणि आत्मगौरवाचे भान जिवंत राखण्याची शिक्षण-परंपरा सातवळेकरांच्या घरात अनेकानेक वर्षांच्या श्रमांमुळे होती हे दिसणे अधिक अभ्यासामुळे शक्य झाले. मी दुसऱ्या परिच्छेदात वर्णिलेल्या महनीय व्यक्तींच्या प्रामाणिक - धीरगंभीर - सरळ - स्वच्छ बुद्धीच्या याच समाजाच्या विद्यासंपन्न - आचारसंपन्न - विचारसंपन्न अशा हजारो वर्षांच्या परंपरेमुळे पं. सातवळेकर तसे घडले; इतर कोणामुळे नव्हेत ! त्यांच्या वंशाची चर्चा तर सूर्यावर थुंकण्याचे समाधान देणारी ठरेल. तुकाराम महाराजांसारख्यांना जातीमुळे हलके ठरविणाऱ्या विष्णुशास्त्रीसारख्यांनी निर्माण केलेल्या परिस्थितीचा आदर्श सातवळेकरांसमोर असणेच शक्य नाही. गोखले म्हणतात तशी ओजस्वी-तेजस्वी परंपरा खरेच असती तर .... 'टिळकांना सहा वर्षांचा तुरुंगवास घडल्यामुळे तरुणांना पाठीशी घालील असा एकही पुढारी महाराष्ट्रात नव्हता' (पान ९३) ... हे त्याच पुस्तकात वाक्य लिहिण्याची वेळ श्री. गोखलेंवर आली नसती. एखाद्या माणसाच्या अनस्तित्वामुळे सर्व यंत्रणाच कोलमडत असेल तर कसलं आलंय त्या परंपरेचे व परिस्थितीचे कौतुक ? मला मोठ्या लोकांच्या या मानसिकतेचं मात्र दुःखद आश्चर्य वाटतं !

संपादकांनी पानांची मर्यादा घातल्यामुळे लिखाण थांबवावे लागत आहे. अशा प्रकारचे अनेक आघात सोसूनही, तथाकथित चलाख, बुद्धिमान लोक, सभोवती, खाली ओढण्यात तत्पर असे असतानाही अनेक गुणवन्त, प्रज्ञावंत असे पं सातवळेकर, मोरोपंत, बाळासाहेब खेर, वि. स. खांडेकर, भा. रा. तांबे, गोविंद वल्लभपंत पराडकर, दादासाहेब मावळंकर, भडकमकर अशी अनेकानेक कऱ्हाडे व्यक्तिमत्त्व अस्सल स्वयंभू गुणांमुळे तेजाळून निघाली. म्हणून म्हणतो, यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा ?

१) अधिक माहितीसाठी पहा
www-thekarhaadaa.org

२) पुढील नमस्कारार्ह व्यक्ती
**कविताकामिनीकान्त श्री. भास्कर रामचंद्र तांबे**

**अवधूत हर्डीकर**
१६ए, गणेशकृपा सोसायटी,
परमहंसनगर, पौड रोड,
पुणे ४११०३८